पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: nss@sus.ac.in विस्तारित क्र.: २२७

NAAC Accredited-2022 'B++' (CGPA 2.96)

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

जा. क्र. पुअहोसोविसो/ रा.से.यो./२०२४/ 5692 दिनांक: 9 AUG 2024

प्रति,
मा. प्राचार्य,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित
रासेयो एकक असलेले सर्व महाविद्यालये व अधिविभाग, रासेयो

विषय- "हर घर तिरंगा" या उपक्रमाचे आयोजन करणेबाबत.

संदर्भ- मा. मनिषा कुंभार, निवासी जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे दि.०९/०८/२०२४ रोजीचे प्राप्त पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन मा. पंतप्रधान यांनी जाहीर केल्याप्रमाणे दि०.०९ ते १५ ऑगस्ट, २०२४ या कालावधी मध्ये "हर घर तिरंगा" म्हणजे घरोघरी तिरंगा या कार्यक्रमाची अंमलबजावणी सर्व देशभर केली जाणार आहे. भारतीय जनतेमध्ये व विशेषत: नवीन पिढीच्या युवकांच्या मनामध्ये राष्ट्र भक्ती जागृत व्हावी व या राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त सक्रीय सहभाग घ्यावा. या करिता सदरचे अभियान राबविण्यात यावे. असे महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी संदर्भिय पत्रान्वये या विभागास कळविले आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेले सर्व महाविद्यालये व अधिविभाग रासेयो यांना कळविण्यात येते की, मा. मनिषा कुंभार, निवासी जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्या प्राप्त पत्रानुसार दि.१३,१४ व १५ ऑगस्ट या तिनही दिवशी प्रत्येक घरोघरी तसेच दुकाने, खासगी आस्थापना व सर्व शासकीय कार्यालयांच्या इमारतीवर राष्ट्रध्वज फडकविला जाईल त्या अनुषंगाने जनजागृती करण्यात यावी. "हर घर तिरंगा" या अभियानातंर्गत दि.०९ ते १५ ऑगस्ट, २०२४ या कालावधी मध्ये पत्रात नमुद विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहित नमुन्यामध्ये टंकलेखित करुन या विभागाच्या nss@sus.ac.in मेलवर पाठविण्यात यावा ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्रा.डॉ. आर. के. वडजे)
सचालक, रासेयो

सोबत- वरीलप्रमाणे

Drive-D/NSS-2024/All Letter

forwarded
(10/8/24)

- Inform to all the Staff members & students
- Put on website & students N.B.

10/8/24

Sinhgad College of Engineering, Vadgaon
Inward Gen-49
Date 10/08/24
Sign